04-05-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/3/2025 10:24 PM Page 1



## निवडक

### न्हावेलीत परशुराम जयंतीनिमित्त हभप किरण बुवा तुळपुळे यांचे व्याख्यान

■ टीम दैनिक हेराल्ड



**डिचोली, दि. ३ :** दि २९ एप्रिल रोजी वैशाख शुद्ध तृतीया या दिवशी महाविष्णुंचे सहावे अवतार परशुराम यांची जयंती साजरी करण्यात आली. श्री स्वामी समर्थ मठ फणसवाडी न्हावेली (साखळी) येथे सायंकाळी वेदमूर्ती संदीप टेंगसे, मिलिंद जोशी, हिंदू जनजागृती समितीचे उत्तर गोवा अध्यक्ष गोविंद चोडणकर, स्वामी समर्थ मठाचे अध्यक्ष व हभप किरण बुवा तुळपुळे व विविध ठिकाणांहून आलेले ब्रम्हवृंद यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली,
प्रथम परशुराम प्रतिमा पूजन करण्यात आले व त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. वेदमूर्ती संदीप पेंडसे यांनी प्रास्ताविक केले. हभप किरण बुवा तुळपुळे यांचे परशुरामांच्या जिवनावर व्याख्यान झाले. बुवांनी परशुरामांची जन्मकथा व पराक्रम व कार्य विशद केले त्यांनी कोकण भूमी कशी निर्माण केली व गोमंतक हे नाव कसे पडले, चित्पावन ब्राम्हणांची उत्पत्ती कशी झाली वगैरे सांगीतली. निर्माण होणाऱ्या अनेक शंकांचे निरसन ही व्याख्यानातून केले. कार्यक्रमासाठी पुरोहित सचिन आपटे यांनी विशेष परिश्रम घेतले व संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

---

### केरी न्यू इंग्लिश स्कूलतर्फे माजी चेअरमन डॉ. नाईक यांना श्रद्धांजली



**केरी : न्यू इंग्लिश स्कूलचे माजी चेअरमन डॉ. अनंत नाईक यांना श्रद्धांजली अर्पण करताना न्यू इंग्लिश हायस्कुलचे व्यवस्थापन मंडळ, पालक शिक्षक संघ, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ३ :** केरी न्यू इंग्लिश हायस्कुलच्या व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष दिवंगत डॉ. अनंत नाईक यांना शाळेतर्फे केरी येथे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.
न्यू इंग्लिश हायस्कुलच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व्रजेश केरकर, उपाध्यक्ष विठ्ठल गडेकर, खजिनदार मिलिंद तळकर, व्यवस्थापक शैलेंद्र कुबल, सहसचिव दत्ताराम नाईक, कार्यकारी सभासद सूरज तळकर, बाबुसो तळकर, राजन सावळ, देवेंद्र गाड, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष अमृत पेडणेकर, उपाध्यक्षा संजना तळकर, सुप्रिया केरकर, माजी मुख्याध्यापिका बर्था फर्नांडिस, मुख्याध्यापक भावार्थ मांद्रेकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थिती होते.
याप्रसंगी व्रजेश केरकर म्हणाले कि, डॉ नाईक हे केरी गावचे सुपुत्र असून केरी शिक्षण संस्थेचे ते संस्थापकीय अध्यक्ष होते. शाळेच्या स्थापनेपासुन शाळेच्या विकासात त्यांचे भरीव योगदान राहिले आहे. डॉ. नाईक यांच्या जाण्याने केरी गावातील सहृदय आणि संवेदनशील व्यक्तीला आम्ही मुकलो. तसेच त्यांच्या जाण्याने सामाजिक क्षेत्रात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे याबद्दल केरकर यांनी दुःख व्यक्त केले. यावेळी व्यवस्थापन समिती, पालक शिक्षक संघटना, शिक्षक व विद्यार्थी वर्गाने एक मिनिट स्तब्धता पाळून श्रद्धांजली वाहिली.कार्यक्रमाचे निवेदन वैशाली न्हानजी यांनी केले.

# केकेआर आज राजस्थान रॉयल्सशी भिडणार

## प्ले ऑफ दोघांनाही विजय आवश्यक | वैभव सूर्यवंशीच्या खेळाकडे सर्वांच्या असणार नजरा

**कोलकाता, दि. ३ :**

गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) उद्या रविवारी राजस्थान रॉयल्सशी भिडणार आहे. दोन्ही संघ उद्याच्या सामन्यात विजय मिळवून प्लेऑफ फेरी गाठण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. केकेआरला आता लीग टप्प्यात चार सामने खेळायचे आहेत. जर संघाने सर्व सामने जिंकले तर त्यांच्या खात्यात १७ गुण होतील आणि ते सहजपणे पहिल्या चारमध्ये प्रवेश करतील.

केकेआरला या चारपैकी दोन सामने घरच्या मैदानावर खेळायचे आहेत. रविवारी राजस्थान रॉयल्सविरुद्ध खेळल्यानंतर त्यांचा पुढचा सामना बुधवारी त्यांच्या घरच्या मैदानावर चेन्नई सुपर किंग्जशी होईल. याशिवाय, त्यांना १० मे रोजी सनरायझर्स हैदराबाद आणि १७ मे रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध त्यांच्या घरच्या मैदानावर सामने खेळायचे आहेत. सनरायझर्स संघाचा उत्साह कमी झाला आहे पण बंगळुरू संघ उत्तम फॉर्ममध्ये आहे आणि अशा परिस्थितीत कोलकाताचा अंतिम सामना खूप रंजक होण्याची शक्यता आहे.

पण ते नंतरचे आहे आणि केकेआरला आता घरच्या मैदानावर होणाऱ्या दोन सामन्यांवर लक्ष केंद्रित करावे लागेल. राजस्थान आणि चेन्नई संघ प्लेऑफच्या शर्यतीतून जवळजवळ बाहेर पडले आहेत आणि अशा परिस्थितीत ते कोणत्याही विशेष दबावाशिवाय मैदानात



उतरतील, ज्याचा सामना करणे केकेआरसाठी सोपे नसेल.

केकेआरची सर्वात मोठी चिंता म्हणजे घरच्या मैदानावर त्यांची खराब कामगिरी. ईडन गार्डन्स हा एकेकाळी त्यांचा बालेकिल्ला होता, परंतु यावेळी त्यांनी आतापर्यंत पाचपैकी फक्त एकच सामना जिंकला आहे तर पंजाब किंग्ज विरुद्धचा शेवटचा सामना पावसामुळे रद्द झाला होता आणि दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळाला.केकेआरचे फिरकीपटू येथे असमान उसळीशी जुळवून घेण्यात अपयशी ठरले आहेत तर त्यांचे फलंदाजही अपेक्षेनुसार कामगिरी करू शकले नाहीत. त्याच्या फलंदाजीत ती आक्रमकता नाहीये जिच्यामुळे त्याच्या संघाने गेल्या वर्षी जेतेपद जिंकले होते.

गेल्या हंगामात चर्चेत आलेला फिनिशर रिंकू सिंग आठ डावांमध्ये फक्त १६९ धावा करू शकला आहे तर सलामीवीर क्विंटन डी कॉकने सात डावांमध्ये १३७.५० च्या स्ट्राईक रेटने १४३ धावा केल्या आहेत. त्याच्या कामगिरीत सातत्याचा अभाव आहे. पण केकेआरसाठी सर्वात मोठी निराशा व्यंकटेश अय्यरने केली, ज्याला फ्रँचायझीने २३.७५ कोटी रुपयांना विकत घेतले आणि उपकर्णधार म्हणून नियुक्त केले. व्यंकटेशने १० सामन्यांमध्ये फक्त १४२ धावा केल्या आहेत.

कर्णधार अजिंक्य रहाणे या हंगामात केकेआरचा सर्वात विश्वासार्ह फलंदाज आहे पण तो क्षेत्ररक्षण करताना झालेल्या हाताच्या दुखापतीशी झुंजत आहे. तो म्हणाला– मी ठीक आहे. मी माझे सर्वोत्तम प्रयत्न करत आहे आणि आशा आहे की मी रविवारी सामना खेळेन.

राजस्थान रॉयल्सची आतापर्यंतची कामगिरी निराशाजनक राहिली आहे. त्याच्या संघाने गेल्या सात सामन्यांपैकी फक्त एकच सामना जिंकला आहे, ज्यामुळे लिलावादरम्यान स्वीकारलेल्या रणनीतीतील त्रुटी देखील उघड होतात.

आयपीएलचा नवा खळबळजनक खेळाडू, १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी याने ३५ चेंडूत शतक झळकावून क्रिकेट जगताचे लक्ष वेधून घेतले, परंतु त्याच्याकडून नेहमीच अशाच कामगिरीची अपेक्षा करता येत नाही.

# संवेदन केंद्राच्या निवासी शिबिराला कुडणेत सुरुवात

▶ कातकरी मुलांच्या व्यक्तिमत्व विकासावर भर

■ टीम दैनिक हेराल्ड

**केरी, दि. ३ :** साखळी येथील संवेदन केंद्रातर्फे कातकरी समाजातील मुलांसाठी आयोजित सात दिवसीय निवासी शिबिराला कुडणे येथे उत्साही वातावरणात सुरुवात झाली. या शिबिराचे आयोजन कुडणे येथील सरकारी प्राथमिक विद्यालयात करण्यात आले आहे.

शिबिराचे उद्घाटन गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा सोमा रामा मळीक यांच्या स्मारकस्थळी, डिचोली भाग शिक्षणाधिकारी संज्योती पावसकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

उद्घाटनप्रसंगी कुडणे ग्रामपंचायतीचे सरपंच बाबला मळीक, पणजी रोटरी क्लबच्या अध्यक्षा तन्वी सावंत, क्लब सदस्य शिवा नाईक, फोंड्याचे समाजसेवक रौफ मुल्ला,. समाजसेवक राहुल शेट वेरेकर, सरकारी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनिता गाड, प्रमुख शिक्षिका दीपश्री गावस, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष शंकर मळीक आणि संवेदन




केंद्राच्या अध्यक्षा माधवी राणे आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिराचे उद्घाटन शिबिरार्थी मुलांच्या हाताला धागा बांधून आणि पाच प्रकारचे धान्य रुजवून करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी संवेदन केंद्राच्या कार्याची प्रशंसा केली. यावेळी नमन सावंत यांनी स्वागत प्रास्ताविक केले. कविता यमकर यांनी सूत्रसंचालन व स्नेहा गावस यांनी आभार मानले.

या शिबिरात आदिवासी कातकरी समाजातील आणि इतर समाजातील एकूण ५० मुले सहभागी झाली आहेत. शिबिरात सात दिवस विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. माध्यमिक वर्गातील मुलांसाठी नाट्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास साधण्यावर भर दिला जाणार आहे. तर प्राथमिक वर्गातील मुलांसाठी आनंददायी शिक्षणाचे विविध कार्यक्रम राबवले जाणार आहेत.




**साळ : येथील सरकारी हायस्कूलच्या मेंग्रुस युनिटमध्ये सामिल झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत मुख्याध्यापक विशाल शिंगणापूरकर, डॉ. धारगळकर, डॉ. देवानंद, डॉ. शाहिद वापर, शिक्षिका नुप्रिया नाईक व मान्यवर.**

### मेंग्रुस वाचवण्यासाठी सरकारी माध्यमिक विद्यालय मेरशी यांचा पुढाकार

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ३ :** सरकारी माध्यमिक विद्यालय मेरशी येथे मेंग्रुस सोसायटी तर्फे मेंग्रुस युनिट ची स्थापना करण्यात आली. कमी होत चाललेल्या मेंग्रुसची संख्या पाहता त्यांच्या संरक्षणासाठी गेली कित्येक वर्षे मेंग्रुस सोसायटी कार्यरत आहे. त्यात मेरशी विद्यालयाने भाग घेतला आहे.

या कार्यक्रमा वेळी व्यासपीठावर उपस्थित होते डॉ. धारगळकर, डॉ. देवानंद, डॉ. शाहिद वाफर, शाळेचे मुख्याध्यापक विशाल शिंगणापूरकर, विज्ञान शिक्षिका कनुप्रिया नाईक उपस्थित होते.

यावेळी डॉ. धारगळकर यांनी मेंग्रुसचे महत्त्व सांगितले. सविस्तर माहिती डॉ. शाहिद वाफर यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षिका वैष्णवी बोरकर तर शिक्षक विशारद वेळुसकर यांनी आभार मानले.

# अमेय विद्याप्रसारक मंडळाच्या प्राथमिक शाळेतर्फे उन्हाळी शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ३ :** अमेय विद्याप्रसारक मंडळाच्या प्राथमिक शाळेतर्फे आयोजित उन्हाळी शिबिराची आज सांगता झाली. याप्रसंगी शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप खांडेपारकर , व्यवस्थापक तथा श्री अमेय उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सुभाष जाण, शाळेचे मुख्याध्यापक सुशांत उजगावकर, प्राथमिक शाळेच्या कार्यवाह सुषमा पाटील, तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

२१ ते २५ एप्रिल या दरम्यान उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात योग, कला, नाट्य, क्रीडा, रांगोळी, कथाकथन, संगीत अशा उपक्रमाचा समावेश करण्यात आला होता. प्राथमिक विभागाच्या



विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने शाळा व्यवस्थापनने हे खास शिबिर आयोजित केले होते. शिबिरात योग प्रशिक्षिका डॉ. अरुणा भदोरीया, कला शिक्षक संकेत लवंदे व इतरांचे मागदर्शन लाभले.या प्रसंगी शिक्षकांचे अभिनंदन करताना अशा अधिक उपक्रमाच्या आयोजनाची अपेक्षा श्री. खांडेपारकर यांनी केली. प्राचार्य जाण यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे कौतूक करताना अशा उपक्रमांचे विद्यार्थ्यांच्या मनावर खोलवर चांगले परिणाम होत असल्याचे नमूद केले.श्री खांडेपारकर यांच्या हस्ते शिबिरार्थी विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थीनी रिचा नाईक हिने केले, तर या कार्यक्रमाचा पूर्ण आढावा हितिशा हिने घेतला. सर नेन्सीकुमारी हिने आभार प्रदर्शन केले.

# तंदुरुस्त राहण्यासाठी सजगता बाळगावी

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर

▶ वार्षिक क्रीडा व बक्षीस वितरण

**हरमल, दि. ३ :** विद्यार्थ्यांनी स्वखुशीने नर्सिंग करीयर निवडले असल्याने,जेव्हा विविध स्थितीत रुग्णांची सेवा करण्याची संधी मिळेल. तेव्हा नर्सेसनी स्वतः तंदुरुस्त असणे आवश्यक असते,त्यासाठी आरोग्य विषयी नेहमीच सजगता बाळगावी, असे आवाहन हरमल पंचक्रोशी शिक्षण संस्थेचे चेअरमन तथा माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांनी केले.

हरमल पंचक्रोशी संस्थेच्या ज्ञानदा सभागृहात, आयोजित कॉलेज ऑफ नर्सिंगच्या वार्षिक क्रीडा दीन व बक्षीस वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे नात्याने बोलत होते. नर्सिंग कॉलेजने दुसऱ्या वर्षात पदार्पण केले आहे. मात्र अवघ्या वाटचालीत विद्यार्थ्यांनी दिमाखदार कामगिरी केली, त्याबद्दल अभिनंदन आहे. या शिक्षण संस्थेची पाचही आस्थापने यात, प्राथमिक, हायस्कूल, उच्च माध्यमिक विद्यालय, पार्सेकर कॉलेज ऑफ एज्युकेशन व नर्सिंग कॉलेज, एकत्रित असून प्रत्येक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी एकमेका सहाय्य करू. या उक्तिने कार्यरत असल्याने आनंद वाटतो.

नर्सेसनी लेक्चर, क्लिनिकल इत्यादी बरोबर क्रीडा स्पर्धात भाग घेऊन बक्षिसे पटकावली. त्याशिवाय शारीरिक फिटनेस महत्त्वाचा असून, तुम्ही तंदुरुस्त असणे गरजेचे असते,तुम्ही फिट असल्यास, रुग्णसेवा व्यवस्थित होईल. त्यासाठी दिवसातून ठरविक वेळ फिटनेस साठी द्यावा व फिटनेस राखावा. स्वतः फास्ट फूडच्या




**हरमल – हरमाल पंचक्रोशी शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ नर्सिंग च्या वार्षिक क्रीडा दीन सोहळ्याचे उद्घाटन करताना खास निमंत्रित लेफ्ट डॉ अनिकेत केरकर सोबत चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर,शशांक पार्सेकर व प्राचार्य कीरूबा पॉल व संयोजक रेमो मनोज**

आहारी न जाता, इतराना प्रवृत्त करा, अन्यथा सगळेच म्हणजे, स्वर्गात सुध्हा फास्ट जाण्याची शक्यता असते. त्यामुळे आहार नियंत्रित ठेवण्याचे काम, या वयात होणे आवश्यक असल्याचे,आवाहन चेअरमन पार्सेकर यांनी केले.

पुढील वर्षी कॉलेजची नवीन सुसज्ज इमारत तयार होईल. त्यावेळी आवश्यक सुविधा उपलब्ध केल्या जातील. सरकारकडून नर्सिंग कॉलेजला अनुदान प्राप्त झाले की, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल व साहजिकच फी शुल्क कमी होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यास व स्पर्धातुन असेच दैदिप्यमान यश मिळवावे, असे आवाहन चेअरमन पार्सेकर यांनी केले.

विद्यार्थ्यांनी अभ्यास व्यतिरिक्त खेळातही चांगली कामगिरी केली. खरे म्हणजे,खेळ हा सर्वोत्कृष्ट असून त्यातून मन व आरोग्य चांगले राहते, जेणेकरून नर्सिंग करीयर घेटलेल्याना न्याय होईल.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य श्रीमती किरूबा, कॉलेजचे क्रीडा प्रशिक्षक शशांक पार्सेकर व अध्यापिका अंकिता मेथर उपस्थित होते. प्रारंभी चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर यांनी दीपप्रज्वलन केले. यावेळी विद्यार्थी मंडळाची निवड घोषित केली. उपाध्यक्ष सायली शेट्ये, सांस्कृतिक सचिव सिनोव्हा बॅरटो,क्रीडा सचिव दिशा गवस,खजिनदार मदन देसाई व सरचिटणीस हार्दिक होळकर यांची निवड जाहीर केली.मान्यवराहस्ते त्यांना नेमप्लेट देण्यात आले. तसेच आयोजित क्रिकेट, बॅडमिंटन, रीले, व्हॉलिबॉल आदी स्पर्धात विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

अध्यापिका सिमरन नाईक व प्रतीक्षा वस्त यांनी मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.विविध स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरंच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.सूत्रनिवेदन अध्यापिका शमिका नर्से व अध्यापिका शिना आरोलकर तर शेवटी प्रा अंकिता मेथर हिने आभार मानले.

# गुजरातचा हैदराबादवर दणदणीत विजय

## गिल-बटलरचे अर्धशतक | सिराज-प्रसिद्धने घेतल्या २-२ विकेट

**अहमदाबाद, दि. ३ :**

गुजरात टायटन्सने शुक्रवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादला ३८ धावांनी हरवून इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२५ च्या पॉइंट्स टेबलमध्ये दुसऱ्या स्थानावर झेप घेतली. जीटी दुसऱ्या स्थानावर पोहोचला असताना, एसआरएचला आणखी एक पराभव पत्करावा लागला आणि प्लेऑफमध्ये पात्रता मिळवण्याच्या त्यांच्या आशा जवळजवळ संपल्या आहेत.

२२५ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना, एसआरएचचे सलामीवीर अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड (२०) यांनी ४९ धावांची




सलामी भागीदारी रचली. अभिषेक बाद झाल्यानंतर, अभिषेकने आपली कामगिरी कायम ठेवली तर इशान किशन (१३) आणि हेनरिक क्लासेन (२३) यांनी त्याच्यासोबत छोट्या भागीदारी केल्या.

अभिषेकने ४१ चेंडूत ७४ धावांची दमदार खेळी केली, परंतु त्याला दुसऱ्या टोकाकडून साथ मिळाली नाही. परिणामी, आवश्यक धावगती वाढतच गेली आणि एसआरएचला पराभवाचा सामना करावा लागला. मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

सामन्याच्या सुरुवातीला, एसआरएचने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. जीटीच्या टॉप ऑर्डरने स्पर्धेत पुन्हा एकदा सर्व बाजूंनी जोरदार कामगिरी केली आणि साई सुधरसन (४८) आणि शुभमन गिल (७६) या सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी ८७ धावांची भागीदारी केली. सुधरसनला झीशान अन्सारीने बाद केल्यानंतर, जोस बटलर (६४) मध्यभागी आला आणि गिलसोबत हातमिळवणी करत दुसऱ्या विकेटसाठी ६२ धावांची भागीदारी केली. खालच्या फळीने या गतीचा फायदा घेतला आणि जीटीने धावफलकावर २२४/६ अशी धावसंख्या उभारली. जयदेव उनाडकटने तीन तर पॅट कमिन्स आणि झीशान अन्सारी यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. जीटी त्यांचा पुढचा सामना ६ मे रोजी मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळेल, तर एसआरएच ५ मे रोजी दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध खेळेल.

# दुखापतीमुळे संदीप शर्मा आयपीलमधून बाहेर

**नवी दिल्ली, दि. ३ :**

राजस्थान रॉयल्सचा वेगवान गोलंदाज संदीप शर्मा दुखापतीमुळे उर्वरित आयपीएल सामन्यांमधून बाहेर पडला आहे. गुजरात टायटन्स विरुद्धच्या सामन्यात गोलंदाजी करताना त्याला हाताला दुखापत झाली. वैद्यकीय अहवालात त्याच्या बोटाला फ्रॅक्चर झाल्याचे उघड झाले आहे, त्यामुळे तो उर्वरित सामने खेळणार नाही.

दुसरीकडे, राजस्थान रॉयल्सचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक दिशांत याज्ञिक म्हणाले की, त्यांचा संघ सुपरस्टार खेळाडू खरेदी करत नाही. उलट, ते खेळाडूंना खरेदी करते आणि त्यांना सुपरस्टार बनवते. संघातील १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने ३५ चेंडूत शतक झळकावले, त्या शतकानंतर



प्रशिक्षकांनी हे विधान केले.

३१ वर्षीय संदीप २८ एप्रिल रोजी राजस्थानच्या घरच्या सामन्यात जखमी झाला होता. शुभमन गिलच्या शॉटवर स्वतःच्या चेंडूवर क्षेत्ररक्षण करताना तो जखमी झाला. फिजिओने त्याची तपासणी केली, पण संदीप पॅव्हेलियनमध्ये गेला नाही आणि त्याने त्याच्या स्पेलमधील उर्वरित ८ चेंडू टाकले.

राजस्थान रॉयल्सने म्हटले आहे की, गुजरातविरुद्ध दुखापत असूनही संदीपने गोलंदाजी केली. फ्रँचायझीमधील प्रत्येकाला त्याच्या लवकर बरे होण्याची आशा आहे. संदीप शर्माने या हंगामात १० सामन्यांमध्ये ९.८९ च्या इकॉनॉमीने गोलंदाजी केली आणि ९ विकेट्स घेतल्या. दुखापतीमुळे तो मुंबईविरुद्ध खेळू शकला नाही. त्याच्या जागी आकाश माधवालला संधी मिळाली, पण तो एकही विकेट घेऊ शकला नाही.

खराब कामगिरी असूनही रॉयल्सचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक दिशांत याज्ञिक यांनी संघाच्या तरुण खेळाडूंचे कौतुक केले. त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, आमच्या संघात आलेले सर्व तरुण खेळाडू सुपरस्टार नव्हते. फ्रँचायझीमध्ये सामील झाल्यानंतर ते सुपरस्टार बनले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २४१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 241 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .